# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग

सत्यमेव जयते

मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग-४१६८१२

(सामान्य शाखा)

दूरध्वनी क्रमांक ०२३६२-२२८६०८, २२८८४७ | ईमेल-collroffice@gmail.com


जा.क्र.डेस्क-6/जीआव्यप्रा/कोरोना प्रतिबंध/04/2020

दिनांक 09/04/2020

**वाचले:-** 1. भारतीय साथ रोग नियंत्रण, 1897

2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्र.करोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य-5, दिनांक 13/3/2020, 14/3/2020 तसेच 15/03/2020

4. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 (1) (3)

5. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसूचना No.DMU/2020/CR.92/DisM-1 दि.23 व 24 मार्च, 2020

6. गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.40-3/2020-डी दिनांक 24/03/2020

**आदेशः-**

ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत करोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात प्रवास करीत आहेत. असे प्रवासी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे करोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे करोना विषाणूचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

ज्याअर्थी कोरोना शासनाने करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि. 13/03/2020 पासुन लागु करुन, खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्यान्वये करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन तोंडाला मास्कचा वापर करणे गरजेचे झालेले आहे.

त्याअर्थी मी के. मंजुलक्ष्मी, साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897, खंड 2, 3 व 4 मधील तरतुदी व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 नुसार सिंधुदुर्ग जिल्हयातील क्षेत्रामध्ये मास्क वापरण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे आदेश लागू करीत आहे.

1. जिल्हयातील कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही कारणासाठी सार्वजनिक ठिकाणी (रस्ते, दवाखाने, कार्यालये, बाजारपेठ इ.) जाताना तीन पदरी मास्क किंवा साधा कापडी मास्क किंवा रुमाल किंवा कापडाने नाक व तोंडू झाकून वावरणे बंधनकारक करणेत येत आहे.

2. यासाठी वापरण्यात येणारे मास्क हे प्रमाणित असलेल्या कोणत्याही औषध दुकानात मिळणारे किंवा घरगुती तयार करण्यात आलेले कापडाचे, रुमालाचे धुण्यायोग्य असावेत. तसेच त्याचा पुनर्वापर करताना स्वच्छ धुवून निर्जंतुकिकरण करुन वापरावेत. असे मास्क प्रत्येकाचे स्वतंत्र असावेत व एकमेकांमध्ये हस्तांतरीत करु नयेत. वापर झालेले असे सर्व मास्क इतरत्र टाकून न देता जाळून नष्ट करावेत.

3. कोणत्याही नागरिकांनी किंवा शासकीय /निमशासकीय / खाजगी कर्मचा-यांनी त्याचे स्वतःच्या अथवा कार्यालयाच्या वाहनातून आपल्या कार्यक्षेत्रात किंवा कार्यालय परिसरात प्रवास करताना, काम करताना, बैठकीचे वेळी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी दोन व्यक्तींनी एकत्र येताना सुरक्षित अंतर (Social Distancing ) ठेवणे व मास्क वापरणे बंधनकारक करण्यात येत आहे.

4. सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी वावरताना, शासकीय अधिकारी, कर्मचारी व इतर सर्व विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी वरील सुचनांच्या बरोबर बैठकीसाठी अथवा इतर कोणत्याही कायदेशीर कारणासाठी एकत्र येताना परस्परात वैद्यकियदृष्ट्या निर्धारित केलेले सामाजिक अंतराचा (Social Distancing) निकष पाळणे बंधनकारक आहे.

5. कोणत्याही नागरीकांस सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, धाप लागणे, थकवा येणे इ. कोरोना सदृष्य आजाराची लक्षणे दिसत असल्यानी त्यांनी त्वरीत सक्तीने वैद्यकिय तपासणी करुन घेणे व शासकीय रुग्णालयांच्या सल्याने कोरोना विषाणू संसर्ग तपासणीशासकीय निर्धारित ठिकाणी करुन घेणे त्याचप्रमाणे लक्षणे दिसू लागताच त्याबाबत आरोग्य / वैद्यकिय अधिका-यांना माहिती देणे बंधनकारक करण्यात येत आहे. कोणीही अशी लक्षणे लपवल्यास व त्याची माहिती शासकीय आरोग्य यंत्रणेला न दिल्यास त्यांचेवर साथ रोग नियंत्रण कायदा 1897 अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

6. कोणतीही व्यक्ती कोरोना विषाणू तपासणीत पॉझीटीव्ह किंवा बाधीत आढळून आल्यास अशा व्यक्तींच्या पुढील दोन तपासण्या निगेटिव्ह येत नाहीत तोपर्यंत वैद्यकिय सल्याने शासकीय विलगीकरण केंद्रात किंवा आरोग्य / वैद्यकिय अधिका-यांनी निर्धारित केलेल्या विलगीकरण किंवा अलगीकरण केंद्रात राहणे बंधनकारक करण्यात येत आहे.

7. कोणतीही व्यक्ती कोरोना विषाणू तपासणीत पॉझीटीव्ह किंवा बाधीत आहे असे आढळून आल्यास त्या व्यक्तीने व त्यांचेशी थेट किंवा इतर पध्दतीने संबंधित व संपर्कात आलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा मागील एक महिन्याचा पूर्व इतिहास, भेटी दिलेल्या ठिकाणांची व संपर्कात आलेल्या व्यक्तींची माहिती, प्रवासाबाबतची माहिती किंवा आवश्यक सर्व माहिती शासनास देणे बंधनकारक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अशा सर्व व्यक्तींना वैद्यकिय सल्याप्रमाणे निर्धारित कालावधीसाठी विलगीकरण किंवा अलगीकरणात राहणे बंधनकारक करण्यात येत आहे.

8. सर्व नागरिकांनी कोणतेही कामकाजपार पाडताना कोवीड-19 या विषाणू संसर्ग प्रतिबंध उपाययोजनांची आवश्यक ती काळजी घ्यावी. शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने यासंबंधी वेळोवेळी दिलेल्या सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणा-यांविरुध्द भारतीय दंड संहिता (48 ऑफ 1860) च्या कलम 188 अन्वये कारवाई करण्यात येईल. तरी या आदेशावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, व याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(के. मंजुलक्ष्मी)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
सिंधुदुर्ग

**प्रति,**

सर्व नागरिक, सिंधुदुर्ग जिल्हा

**प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठीः**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग
2. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग
3. सर्व विभाग प्रमुख, सिंधुदुर्ग जिल्हा
4. उपविभागीय दंडाधिकारी, कणकवली/कुडाळ/सावंतवाडी.
5. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सर्व.
6. मुख्याधिकारी सर्व नगरपालिका/नगरपंचायत, जि. सिंधुदुर्ग
7. जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.